# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## अधिसभेच्या ८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## शनिवार, दि.१५ मार्च, २०१४ दुपारी १२:०० वा.

अधिसभेची ८ वी बैठक दि.१५ मार्च, २०१४ रोजी दुपारी १२:०० वा. विद्यापीठ सभागृहात मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन.- कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. श्रीमती विंचूरकर ए. ए., विभागीय सहसंचालक, सोलापूर विभाग | सदस्या |
| ३) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. - संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ४) | श्री. नलावडे पी. आर., संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ | सदस्य |
| ५) | डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ६) | प्राचार्य डॉ. शेख जी. ए. | सदस्य |
| ७) | प्राचार्य डॉ. चिट्टे जी. एन. | सदस्य |
| ८) | प्राचार्य डॉ. देशमुख ए. एल. | सदस्य |
| ९) | प्राचार्य डॉ. चौधरी बी. व्ही. | सदस्य |
| १०) | प्राचार्य डॉ. श्रीमती पवार व्ही. यू. | सदस्या |
| ११) | प्राचार्य डॉ. हलकुडे एस. ए. | सदस्य |
| १२) | प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. | सदस्य |
| १३) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| १४) | प्राचार्य श्री. धुत्तरगाव एस. सी. | सदस्य |
| १५) | प्राचार्य डॉ. शिंदे डी. के. | सदस्य |
| १६) | प्राचार्य श्री. राजमाने एन. आर. | सदस्य |
| १७) | प्राचार्य डॉ. जुंदळे एस. बी. | सदस्य |
| १८) | प्राचार्य डॉ. शेंडगे आर. एन. | सदस्य |
| १९) | प्राचार्य डॉ. फरताडे एम. एम. | सदस्य |
| २०) | प्राचार्या डॉ. श्रीमती वडवान एम. ए. | सदस्या |
| २१) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| २२) | डॉ. रोंगे बी. पी. | सदस्य |
| २३) | कु. कोरे पी. पी., अध्यक्षा, विद्यापीठ विद्यार्थी परिषद | सदस्या |
| २४) | श्री. शिंदे एम. बी., सचिव, विद्यापीठ विद्यार्थी परिषद | सदस्य |
| २५) | डॉ. अवताडे एच. के. | सदस्य |
| २६) | डॉ. कदम आर. डी. | सदस्य |
| २७) | डॉ. कोळेकर टी. एन. | सदस्य |
| २८) | डॉ. चव्हाण सी. एस. | सदस्य |
| २९) | डॉ. भोसले यु. व्ही. | सदस्य |
| ३०) | डॉ. बाड डी. आर. | सदस्य |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| ३१) | डॉ. गायकवाड एस. पी. | सदस्य |
| ३२) | डॉ. बचुटे एम. टी. | सदस्य |
| ३३) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ३४) | डॉ. बारबोले ए. एन. | सदस्य |
| ३५) | डॉ. भिलेगावकर एस. डी. | सदस्य |
| ३६) | डॉ. श्रीमती दळवी आर. जे. | सदस्या |
| ३७) | डॉ. गेंगजे एस. आर. | सदस्य |
| ३८) | डॉ. काशीद एस. एस. | सदस्य |
| ३९) | डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. | सदस्या |
| ४०) | डॉ. श्रीमती रेवडकर बी. डी. | सदस्या |
| ४१) | डॉ. शिंदे एस. व्ही. | सदस्य |
| ४२) | आम. श्री. पाटील सी. बी. | सदस्य |
| ४३) | श्री. गायकवाड आर. एस. | सदस्य |
| ४४) | श्री. देशपांडे ए. व्ही. | सदस्य |
| ४५) | श्री. गायकवाड एस. पी. | सदस्य |
| ४६) | श्री. कोकरे एम. बी. | सदस्य |
| ४७) | श्री. चौगुले एस. एस. | सदस्य |
| ४८) | श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ४९) | प्राचार्य श्री. जमादार के. एम. | सदस्य |
| ५०) | डॉ. वडगावकर पी. पी. | सदस्य |
| ५१) | श्री. वाघमोडे एस. एम. | सदस्य |
| ५२) | श्री. रिसबूड एस. एच. | सदस्य |
| ५३) | डॉ. भोसले आर. बी. | सदस्य |
| ५४) | डॉ. पाटील आर. आर. | सदस्य |
| ५५) | डॉ. पवार एन. बी. | सदस्य |
| ५६) | डॉ. निंबाळकर व्ही. एच. | सदस्य |
| ५७) | डॉ. कदम डी. जी. | सदस्य |
| ५८) | डॉ. एम. कृष्णमूर्ती | सदस्य |
| ५९) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| ६०) | डॉ. श्रीमती रंगरेज ए. एम. | सदस्या |
| ६१) | श्री. कदम एल. एस. | सदस्य |
| ६२) | श्री. घागरे एम. व्ही. | सदस्य |
| ६३) | डॉ. सूर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ६४) | डॉ. गवळी आर. एस. | सदस्य |
| ६५) | डॉ. लोणीकर एस. व्ही., प्रभारी परीक्षा नियंत्रक | निमंत्रित |
| ६६) | श्री. अनपट एस. बी., प्रभारी वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित |
| ६७) | श्री. माळी एस. के. | सचिव |

**<u>स्वागतः</u>**

मा.कुलसचिव यांनी अधिसभेच्या सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

अधिसभेवर नव्याने निवड झालेले सदस्य प्राचार्य डॉ. शेख जी. ए., प्राचार्य डॉ. चौधरी बी. व्ही., प्राचार्या डॉ. श्रीमती पवार व्ही. यू., प्राचार्य डॉ. शेंडगे आर. एन., डॉ. श्रीमती रेवडकर बी. डी. व डॉ. कदम आर. डी. यांचे मा.कुलगुरु यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.

**<u>अनुपस्थिती :</u>**

डॉ. श्रीमती आपटे एस. एस., डॉ. अशोककुमार ई. एन., सौ. पद्मजादेवी मोहिते-पाटील, प्राचार्य डॉ. कोळेकर सी. बी., श्री. डोंगरे एम. एस. व डॉ. गांधी आर. एच. यांनी पत्राद्वारे व श्री. सपाटे एम. जी., आमदार श्री. दिपकराव साळुंखे-पाटील, श्रीमती विभूते एस. बी. व श्री. कांबळे एन. आर. यांनी दूरध्वनीद्वारे अधिसभेच्या या बैठकीस अनुपस्थिती कळविली. त्यानुसार त्यांच्या अनुपस्थितीस मान्यता देण्यात आली. याशिवाय अधिसभेच्या या बैठकीस मा. प्र. सहसंचालक (तंत्र शिक्षण), मा. संचालक (DMER), आम. कु. प्रणिती शिंदे, आम. श्री. शिंदे बी. व्ही., श्री. शिंदे आर. बी., श्री. व्हनकळस डी. डी., श्रीमती जमादार एम. पी., श्री. शेळके बी. बी., श्रीमती पाटील एस. एन., श्री. रुपनर बी. ए., श्रीमती पाटील पी. पी. व श्री. धोंगडे वाय. ए. हे अधिसभा सदस्य अधिसभेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

लोकमत नॅशनल एज्युकेशन लीडरशिप ॲवार्ड अंतर्गत Award for Outstanding Contribution to Education हा ॲवार्ड मा. प्रा. डॉ. एन. एन. मालदार, कुलगुरु यांना मिळाला असल्याने, माजी संचालक बी. सी. यु. डी. प्राचार्य डॉ. आर. एन. शेंडगे यांच्या हस्ते मा.कुलगुरु यांना पुष्पगुच्छ देवून अभिनंदन करण्यात आले.

कुलसचिवांनी परिनियम ४७४ (१) नुसार, मा.कुलगुरुंना सातव्या अधिसभेच्या बैठकीपासून या बैठकीदरम्यानच्या कालावधीतील प्रगतीचा अहवाल सादर करण्याबाबत विनंती केली व त्याप्रमाणे मा. कुलगुरुंनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला.

**कुलसचिव कार्यालय**

१. जाहिरात क्रं. सोविसो/आस्था/०५/२०१३, दिनांक २१.१०.२०१३ नुसार परीक्षा नियंत्रक आणि वित्त व लेखाधिकारी या दोन संवैधानिक पदासाठी भरती प्रक्रियेची कार्यवाही पूर्ण केली.

२. एम. आय. एस. या प्रणालीची अंमलबजावणी करणेसाठी मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी कळविल्याप्रमाणे नोडल आधिकारी म्हणून विद्यापीठातून श्री. अे. आर. शिंदे; अधिव्याख्याते

संगणकशास्त्र यांची नेमणूक करण्यात आली.

३. विद्यापीठातील विविध संकुलातील खालील शिक्षकांनी उजाळावर्गासाठी सहभाग नोंदविला,

| | | |
|---|---|---|
| अ) | डॉ. श्रीमती. एम. जे. पाटील | मुंबई विद्यापीठ, मुंबई<br>दि. २४.०९.२०१३ ते २५.१०.२०१३ |
| ब) | डॉ. आर. बी. चिंचोळकर | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद<br>दि. ०३.१०.२०१३ ते दि. ३०.१०.२०१३ |
| क) | श्री. व्ही. पी. धुळप | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद<br>दि. ०३.१०.२०१३ ते दि. ३०.१०.२०१३ |
| ड) | श्रीमती जे. डी. ठेंगे | पुणे विद्यापीठ, पुणे<br>दि. ०३.१०.२०१३ ते दि. ३०.१०.२०१३ |

४. विद्यापीठातील विविध इमारतीत एकूण १५ नग फायर एक्सीटींग्यूशर सिस्टिम बसविण्यात आली आहेत.

५. मनुष्यबळ पुरवठादारामार्फत कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना किमान वेतनामध्ये १० टक्के इतकी वाढ करण्याबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे.

६. करिअर ॲडव्हान्समेंट स्किम अंतर्गत सहयोगी प्राध्यापक पदावरुन, प्राध्यापक पदावर पदोन्नती देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण झाली.

७. राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षण अभियान (रुसा) मोहिमे संदर्भात दिनांक १०.०२.२०१४ रोजी बैठक आयोजित करुन विद्यापीठ विकास निधीसाठी प्राथमिक प्रस्ताव मा.संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे कडे सादर करण्यात आला आहे.

८. विद्यापीठाच्या विविध अधिकारमंडळावरील सदस्यांची नांवे, इतर कार्यक्रमाची माहिती थोडक्यात सदस्यांना व विविध मान्यवरांना पाठविण्याचा दृष्टीने विद्यापीठाने IMI Mobile Private Limited, Hyderabad या कंपनीकडून Transactional Route SMS ही योजना कार्यान्वित केली आहे. या मध्ये विद्यापीठास एका वर्षामध्ये १०,००० एस. एम. एस. पाठविता येणार असून याकरिता रु. १,८००/- इतके शुल्क आदा केलेले आहे.

९. विभागीय पदोन्नती समितीची बैठक दिनांक ०७.०२.२०१४ रोजी आयोजित करण्यात आली होती. त्यानुसार पात्र शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यासंदर्भातीत कार्यवाही सुरु आहे.

१०. दिनांक १९.०२.२०१४ रोजी शिवजयंती निमित्त विद्यापीठामध्ये शिवप्रतिमेस मा. कुलगुरुंचे हस्ते पुष्पहार घालून प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सदर कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी, विद्यार्थीनी बहुसंख्येने उपस्थित होते.

११. शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये विद्यापीठातील विविध संकुलाकडे प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय एकूण ५२५ विद्यार्थ्यापैकी ४८२ विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज समाजकल्याण कार्यालयाकडे मंजूरीसाठी पाठविले असता एकूण २३३ विद्यार्थ्याची फी रक्कम रु. २७,८७,८२५/- दिनांक २०.०२.२०१४ रोजी प्राप्त झाली असून ती रक्कम संबधित विद्यार्थ्यांच्या नांवे जमा करण्याचे काम सुरु आहे.

१२. शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ मधील ई-सुविधा फी भरण्या बाबतचा सर्वंकष आढावा घेऊन ज्या महाविद्यालयांनी ई-सुविधा भरली नाही अशा महाविद्यालयांना पत्र पाठवून ई-सुविधा फी भरण्या बाबत अवगत करण्यात आले आहे.

१३. विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचेकडून XIIth Plan General Development Assistantance Grant अंतर्गत विद्यापीठास ७ कोटी रुपये मंजूर झाले आहेत. त्यापैकी रु.२.८ कोटी विद्यापीठास प्राप्त झाले आहेत.

**महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ विभाग**

१४. विभागीय संशोधन समितीने दिनांक २५.१०.२०१३ ते दि. ३१.१०.२०१३ या कालावधीत उपस्थित २५६ विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊन पात्र विद्यार्थ्यांना मार्गदर्शक निश्चित केले.

१५. दिनांक २८ व २९ ऑक्टोंबर, २०१३ रोजी पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ सभागृहामध्ये सेट/नेट कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेत एकूण ४६८ परीक्षार्थी विद्यार्थ्यानी उपस्थिती नोंदविली.

१६. एकूण ३२ प्राध्यापकांकडून प्राप्त झालेले संशोधन प्रकल्प विद्यापीठ अनुदान आयोग विभागीय कार्यालय, पुणे येथे मंजूरीसाठी पाठविण्यात आले.

१७. अहवाल कालावधीत प्रस्तुत विद्यापीठातून एकूण १२ विद्यार्थ्यांची पीएच.डी. मौखिक परीक्षा झाली.

१८. विद्यापीठस्तरीय अविष्कार संशोधन महोत्सवाचे आयोजन दिनांक ०१ व ०२ जानेवारी, २०१४ रोजी नागेश करजगी ऑर्कीड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, तळे हिप्परगा, सोलापूर येथे करण्यात आले होते. सदर अविष्कार महोत्सवात एकूण ३७ विद्यार्थ्याना पारितोषिके प्राप्त झाली असून त्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय अविष्कार महोत्सवाकरीता निवड करण्यात आली. राज्यस्तरीय अविष्कार २०१३ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव येथे दिनांक १६ ते १९ जानेवारी, २०१४ या कालावधीमध्ये संपन्न झाला. या संशोधन महोत्सवामध्ये सोलापूर विद्यापीठातील ६ प्रवर्गातून एकूण

३६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यामध्ये सोलापूर विद्यापीठास एकूण चार पारितोषिके मिळाली.

मानव्यविद्या, भाषा व ललित कला - पदवीगट - प्रथम क्रमांक- सारिका सगरे,

वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र व विधीशाखा - पदव्युतर गट - प्रथम क्रमांक- सुप्रिया आवारे,

पदव्युत्तर पदवी गट- द्वितीय क्रमांक- मुल्ला जैनोद्दीन,

अभियांत्रिकी व तंत्रज्ञान- पदवीगट-द्वितीय क्रमांक

त्याचप्रमाणे सोलापूर विद्यापीठास पुणे विद्यापीठासह या स्पर्धेतील तृतीय क्रमांकाचे सर्वसाधारण विजेतेपद मिळाले.

१९. विजयसिंह मोहिते पाटील महाविद्यालय, नातेपुते या महाविद्यालयास निरंतर संलग्निकरण देण्यात आले.

२०. राष्ट्रीय मुल्यांकंन व अधिस्वीकृती परिषद (नॅक) या कार्यालयाकडे विद्यापीठ स्तरावरुन SSR अहवाल तयार करणेकामी प्राथमिक स्वरुपात सर्व संकुलातील शिक्षकांची बैठक दिनांक १०.०२.२०१४ रोजी संपन्न झाली. त्यामध्ये विविध समित्या गठित करण्याची व अनुषंगीक चर्चा झाली.

२१. सर्व विद्याशाखेच्या संशोधन व मान्यता समितीच्या बैठका दिनांक ०२.०२.२०१४ ते दिनांक १५.०२.२०१४ या कालावधीत आयोजित करण्यात आल्या होत्या. त्या यशस्वीरित्या पूर्ण झाल्या.

२२. विशेषकक्ष या विभागाकडे सहाय्यक प्राध्यापक पदासाठी मागासवर्गीय उमेदवारांचे नांव नोंदणी करण्यात येते. आज तागायत एकूण ८५१ इतक्या मागासवर्गीय उमेदवारांची नांव नोंदणी करण्यात आलेली आहे.

२३. जनविकासकेंद्रांतर्गत नवीन अभ्यासक्रमासाठी संलग्निकरण व संलग्निकरणाच्या नुतणीकरणाची प्रक्रिया सुरु आहे.

२४. पीएच.डी. पुरवणी प्रवेश परीक्षा SUS-PET-२०१३ करीता प्रवेश परीक्षेचे ऑनलाईन अर्ज स्वीकारण्यात आले. दिनांक २५-२-२०१४ रोजी परीक्षा आयोजित करुन त्यांचा निकाल प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

२५. शैक्षणिक वर्ष २०१३-१४ करीता एकूण १० पदवी व १४ पदव्युत्तर नवीन अभ्यासक्रमांना प्रथम संलग्निकरण देण्यात आले.

**परीक्षा विभाग**

२६. विद्यापीठाचा ९ वा दिक्षांत समारंभ दि. २९.११.२०१३ रोजी प्रमुख पाहुणे, केंद्रिय विद्यापीठ, राजस्थानचे कुलगुरु मा. डॉ. एम. एम. साळुंखे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. या समारंभात एकूण १६८६ उपस्थित स्नातकांना पदवी, पदवीका, विद्यावाचस्पती प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली तसेच विद्यापीठीय

विविध अभ्याससक्रमाच्या परीक्षेत गुणानुक्रमे सर्वप्रथम आलेल्या एकूण ११ विद्यार्थ्यांना सुवर्णपदके प्रदान करण्यात आली.

२७. माहे ऑक्टोंबर/नोव्हेंबर, २०१३ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या एकूण १९९ परीक्षांपैकी एकूण १४४ परीक्षांचे निकाल जाहिर करण्यात आलेले आहेत. त्यातील ९३ परीक्षांचे निकाल ४५ दिवसात जाहिर करण्यात आलेले आहेत. ज्या परीक्षांचे निकाल जाहिर झालेले आहेत त्यांची गुणपत्रके महाविद्यालयास पाठविण्यात आलेले आहेत.

२८. या वर्षापासून प्रथमच निकाल जाहिर झालेल्या परीक्षांचे गुणपडताळणी व उत्तरपत्रिका छायांकीत प्रतिसाठी अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्याचे धोरण प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येत आहे.

२९. या वर्षापासून प्रथमच मार्च/एप्रिल, २०१४ मध्ये होणाऱ्या परीक्षेसाठी बहिःस्थ विद्यार्थ्यांकरिता संगणीकृत परीक्षा आवेदन पत्र (Computer Generated Exam Forms) विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करुन प्रक्रिया सुलभ करण्यात आली आहे.

३०. मार्च/एप्रिल, २०१४ मध्ये होणाऱ्या परीक्षांच्या संभाव्य तारखा जाहिर करण्यात आल्या असून त्या संदर्भातील वेळापत्रके विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत.

**वित्त व लेखा विभाग**

३१. विद्यापीठाचे सन २०१३-२०१४ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१४-२०१५ चे मूळ अंदाजपत्रक वित्त व लेखा समितीच्या उपसमिती, वित्त व लेखा समितीकडून तयार करण्यात आले आहे.

**संकुले आणि चर्चासत्रे**

३२. संगणकशास्त्र संकुलात दिनांक १९.१०.२०१३ ते दिनांक २१.१०.२०१३ दरम्यान आंतरराष्ट्रीय सांख्यिकी वर्षानिमित्त संख्याशास्त्र विषयाच्या "National Conference on New Horizons Statistics" या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेसाठी भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाकडून रु. ५०,०००/- एवढे अनुदान मिळाले.

३३. संगणकशास्त्र संकुलामध्ये दिनांक २३ व २४ डिसेंबर, २०१३ रोजी "MATLAB & Image Processing" या कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेस एकूण ७७ संशोधकांनी सहभाग नोंदविला.

३४. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व डॉ. अनंत ॲण्ड लता लाभसेटवार चॅरिटेबल ट्रस्ट, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानमाला दिनांक २४ जानेवारी, २०१४ रोजी मा. डॉ. स्नेहलता देशमुख, माजी कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचे 'समाज स्वास्थ्य व संस्कार' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. या व्याख्यानास विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी अधिकारी वर्ग व विद्यार्थी वर्ग बहुसंख्येने उपस्थित होता.

३५. दिनांक ०६ जानेवारी, २०१४ रोजी सामाजिकशास्त्रे संकुलातील पत्रकारिता व जनसंज्ञापन विभागातर्फे पत्रकारदिन साजरा करण्यात आला.

३६. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी शासनाला वेळोवेळी विद्यापीठाकडून व महाविद्यालयाकडून त्वरीत व बिनचूक माहिती मिळविण्यासाठी पोर्टेल विकसित केले असून त्यास माहिती व्यवस्थापन प्रणाली असे नांव दिले. सदर प्रणालीमध्ये विद्यापीठाने सर्व संलग्नित महाविद्यालयांना दूरध्वनीद्वारे, ई-मेलद्वारे ऑनलाईन माहिती भरणे बाबत कळविले आहे. त्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठातील अभियांत्रिकी विद्याशाखेमधील महाविद्यालये वगळता इतर सर्व माहाविद्यालये या प्रक्रियेत समाविष्ट असून ते ऑनलाईन माहिती भरत आहेत. मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशानुसार विद्यापीठाने ऑनलाईन माहिती व्यवस्थापन प्रणालीमध्ये माहिती भरण्यासंदर्भात महाविद्यालयातील अडीअडचणी सोडविण्यासाठी सर्व संलग्नित महाविद्यालयातील नोडल अधिकाऱ्यांची दिनांक २७ जानेवारी, २०१४ रोजी विद्यापीठात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत संचालक, उच्च शिक्षण कार्यालयातील श्री. ए. ए. बनगे यांनी मार्गदर्शन केले.

३७. दिनांक १९.०२.२०१४ रोजी शिवजयंती निमित्त मुलांच्या वसतीगृहामध्ये मा. कुलगुरुंच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच श्री. बाळासाहेब पोळ यांचे "शिवचरित्र व युवक" या विषयावर व्याख्यान आयोजित केले. सदर व्याख्यानास बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

३८. दिनांक २१.०२.२०१४ रोजी विद्यार्थ्यांकरीता श्री.श्रीमंत शिवाजी कोकाटे यांचे "शिवचरित्रातून आज काय शिकावे?" या विषयावर व्याख्यान आयोजित केले. सदर व्याख्यानास बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते

३९. संगणक संकुलाअंतर्गत कॉम्प्युटर सायन्स व कॉम्प्युटर ॲप्लिकेशनस् या विभागाच्यावतीने राष्ट्रीय स्तरावरील Dexter Innofest २०१४ या स्पर्धेचे दिनांक ०३ जानेवारी, २०१४ रोजी आयोजन केले होते. या स्पर्धेमध्ये एकूण ४०७ स्पर्धक सहभागी झाले होते.

४०. शिक्षणशास्त्र संकुलाकडील सर्व विद्यार्थ्यांनी शिक्षकासमवेत दि. २५.१०.२०१३ रोजी राजीव गांधी मेमोरियल स्कूल ऑफ ब्लाईंड, सोलापूर या संस्थेला भेट दिली आणि तेथील विविध उपक्रमांची माहिती घेतली.

**राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

४१. हिराचंद नेमचंद वाचनालय किर्लोस्कर सभागृह, सोलापूर येथे भारतीय संविधान संवर्धन समिती, सोलापूर या संस्थेने दिनांक २८ नोव्हेंबर, २०१३ रोजी प्रथमच आयोजित केलेल्या संविधान परिषदेस

सोलापूर शहरातील राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विविध महाविद्यालयामधून स्वयंसेवक/स्वयंसेविका व कार्यक्रम अधिकारी यांनी सहभाग नोंदविला.

४२. डिसेंबर, २०१३ रोजी अश्विनी सहकारी रुग्णालयापासून जागतिक एड्स दिनानिमित्त भव्य जनजागरण दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सोलापूर शहरातील विद्यापीठांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयामधून १४०० राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक/स्वयंसेविका व १५ राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी सहभाग नोंदविला.

४३. दिनांक १४.१२.२०१३ ते दिनांक १६.१२.२०१३ या कालावधीत भारती विद्यापीठ विश्वविद्यालय, पुणे येथे संपन्न झालेल्या उत्कर्ष सामाजिक सांस्कृतिक स्पर्धेमध्ये विद्यापीठाअंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयामधून एकूण ०९ मुले व ०९ मुली व ०१ संघनायक यांनी स्पर्धेमध्ये सोलापूर विद्यापीठामार्फत सहभाग नोंदविला. या स्पर्धेमध्ये सोलापूर विद्यापीठास ०२ कास्य पदक व ०३ रौप्य पदक असे एकूण ०५ पदके प्राप्त झाली.

४४. सोलापूर विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे संकुलाकडील पुरातत्वशास्त्र विभागाच्या राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक श्री. गणेश रावसाहेब भानवसे यांची दिनांक २६ जानेवारी, २०१४ रोजी जनपथ, नवी दिल्ली येथील प्रजासत्ताक दिनानिमित्त होणाऱ्या परेडसाठी निवड झाली. या स्वयंसेवकाने सोलापूर विद्यापीठाअंतर्गत परेडमध्ये आपला सहभाग नोंदविला.

४५. दिनांक ९ जानेवारी, २०१४ ते दिनांक १३ जानेवारी, २०१४ या कालावधीत चिखलदरा, जिल्हा अमरावती येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकासाठीच्या साहसी क्रिडा शिबीराकरीता सोलापूर विद्यापीठाअंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयामधून एकूण ०२ स्वयंसेवक, ०२ स्वयंसेविका आणि ०१ संघव्यवस्थापक यांनी सोलापूर विद्यापीठाअंतर्गत आपला सहभाग नोंदविला.

४६. दिनांक २५.०१.२०१४ ते दिनांक ३१.०१.२०१४ या ०७ दिवसांच्या कालावधीमध्ये सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय, टेंभूर्णी यांच्या संयुक्त विद्यमाने एकूण ३०० स्वयंसेवकांचे राज्यस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबीराचे आयोजन मौजे टेंभूर्णी या गावामध्ये करण्यात आले.

४७. महाराष्ट्र कराटे ॲण्ड किक बॉक्सींग फेडरेशन व सोलापूर विद्यापीठ, सोलापूर, आणि गीता परिवार, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यामाने विद्यापीठांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयातील एकूण १७०० महाविद्यालयीन युवतींचा 'रणरागिणी मेघा स्वसंरक्षण प्रतिशिक्षण प्रात्याक्षिक कार्यक्रम' दिनांक १० जानेवारी, २०१४ रोजी शिवस्मारक सोलापूर येथे संपन्न झाला.

४८. वसुंधरा सरंक्षण, मूल्यशिक्षण व राष्ट्रीय एकात्मता, लोककलेची ओळख, आस्वाद, लोकरंजनातून लोकशिक्षण व एक सूर एक ताल प्रशिक्षण दिनांक ११.०२.२०१४ रोजी विद्यापीठ सभागृहामध्ये आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणास सोलापूर शहरातील विविध महाविद्यालयामधून राष्ट्रीय सेवा योजनेचे एकूण २६० स्वयंसेवक/स्वयंसेविका यांना प्रशिक्षण देण्यात आले.

४९. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, आणि विनायकराव पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय जि. औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २०.०२.२०१४ ते दिनांक २६.०२.२०१४ या कालावधीत राज्यस्तरीय शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबीराकरीता सोलापूर विद्यापीठातंर्गत राष्ट्रीय सेवा योजनेचे महाविद्यालयातून एकूण ०६ मुले व ०४ मुली व ०१ संघव्यवस्थापक सहभागी झाले.

**क्रिडा व विद्यार्थी कल्याण विभाग**

५०. आखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्विमिंग मुले/मुली स्पर्धा दिनांक २५.१०.२०१३ ते दि. २९.१०.२०१३ या कालावधीत गुरुनानक देव विद्यापीठ, अमृतसर येथे झाल्या असून सोलापूर विद्यापीठ मुलांच्या संघातून श्री. केतन शिंदे यांनी एक मीटर स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग मध्ये सुवर्ण व तीन मीटर स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग मध्ये रौप्य पदक मिळविले. तर याच स्पर्धेत मुलींच्या संघामधून कु. स्वाती विडप हिने एक मीटर स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग व तीन मीटर स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग मध्ये रौप्य पदक आणि हायबोर्ड डायव्हिंग मध्ये रौप्य पदक मिळविले. आखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्विमिंग मुले/मुलींच्या सर्व जनरल चॅम्पीयनशिप ट्रॉफीचा बहुमान विद्यापीठास प्राप्त झाला.

५१. पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ फुटबॉल (मुले) स्पर्धा मोहनलाल सुखाडिया विद्यापीठ, उदयपूर येथे होणार असून विद्यापीठाचा संघ दिनांक ११ नोव्हेंबर, २०१३ रोजी पाठविण्यात आला.

५२. महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रिडा स्पर्धा सन २०१३-१४ ह्या आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे दिनांक २७.११.२०१३ ते दिनांक ०१.१२.२०१३ या कालावधीत होणार असून यामध्ये सोलापूर विद्यापीठाचे पाच संघ सहभागी होणार असून सदर स्पर्धेच्या सराव शिबीराचे आयोजन दयानंद महाविद्यालय, सोलापूर येथे दिनांक १५.११.२०१३ पासून करण्यात आले.

५३. आखिल भारतीय आंतर विद्यापीठ कुस्ती, मुले/मुली स्पर्धा चौधरी चरणसिंह विद्यापीठ, मेरठ, उत्तर प्रदेश येथे दिनांक २८.१२.२०१३ ते दिनांक ०५.०१.२०१४ या कालावधीत आयोजित केल्या होत्या. सदर स्पर्धा दयानंद विद्यालयातील विद्यार्थी श्री. मुकुंद वाडकर यांनी सुवर्ण पदक मिळविले.

५४. महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रिडा उत्सव स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे दिनांक २७.११.२०१३ ते दिनांक ०२.१२.२०१३ या दरम्यान आयोजित केले होते. सदर स्पर्धेमध्ये सोलापूर विद्यापीठाने आपला सहभाग नोंदविला. या स्पर्धेत सोलापूर विद्यापीठास मैदानी स्पर्धेत गोळा फेक या प्रकारात कु. ज्योती बनसोडे हिने कांस्य पदक तर श्री. अमोल तनपूर याने सिल्व्हर पदक मिळविले.

५५. पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धा (व्हॉलीबॉल मुले) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे दिनांक १४.०२.१४ ते दि. १७.०२.२०१४ या दरम्यान झाला. या स्पर्धेत सोलापूर विद्यापीठाच्या संघाने सहभाग नोंदविला.

५६. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा (एअर रायफल शुटिंग मुले/मुली) पंजाब विद्यापीठ, चंदीगड येथे दिनांक ११.०२.२०१४ ते दिनांक १५.०२.२०१४ या दरम्यान संपन्न झाले. या स्पर्धेत सोलापूर विद्यापीठाने सहभाग नोंदविला.

५७. २९ वा पश्चिम विभागीय युवा महोत्सव शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे दिनांक २६.१२.२०१३ ते दिनांक ३०.१२.२०१३ या कालावधीत आयोजित करण्यात आला होता. युवा महोत्सवासाठी एकूण ४० कलाकार सहभागी झाले होते. सदर महोत्सवात सोलापूर विद्यापीठास शोभा यात्रा या कलाप्रकारात प्रथम तर मिमिक्री, लोकनृत्य, चित्रकला या कलाप्रकारात तृतीय असे एकूण चार बक्षिसे मिळाली.

सदर बैठकीत पुढीलप्रमाणे कामकाज झाले.

**[ १ ] अधिसभेच्या दि.१६ नोव्हेंबर, २०१३ रोजी झालेल्या सातव्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

(टिपणी: सर्व अधिसभा सदस्यांना परिनियम क्र.४८५ नुसार विद्यापीठ पत्र जा.क्र.सोविसो/सनिवि/अधिसभा/६५८४, दि.१३ डिसेंबर, २०१३ अन्वये, दि.१६ नोव्हेंबर, २०१३ रोजी झालेल्या सातव्या बैठकीचा कार्यवृत्तांत पाठविण्यात आलेला होता. या कार्यवृत्तांतामध्ये दुरुस्त्या सुचविण्याची अंतिम तारीख दि.१०/०१/२०१४ अशी होती. या मुदतीत कोणत्याही सदस्यांकडून दुरुस्त्या प्राप्त झालेल्या नाहीत.

सबब, अधिसभेचा दि.१६ नोव्हेंबर, २०१३ रोजी झालेल्या सातव्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यासाठी मान्यतेस्तव सादर).

**ठराव: अधिसभेच्या दि.१६ नोव्हेंबर, २०१३ रोजी झालेल्या सातव्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला.**

**[ २ ] अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यांना दिली जाणारी उत्तरे तसेच पूरक प्रश्न व त्यांना द्यावयाची उत्तरे, परिनियम ४७६(८) च्या तरतूदीमधील विनिर्दिष्टप्रमाणे अधिसभा सदस्यांना अन्य सदस्याने विचारलेल्या प्रश्नास दोन पूरक प्रश्न विचारता येतील.**

(टिपणी: परिनियमानुसार प्रश्न आणि त्यांना व्यवस्थापन परिषदेने तयार केलेल्या उत्तराचे विवरणपत्र परिनियम क्र.४७६(७) अन्वये पाठविण्यात येईल).

ठराव: **अ) प्रश्नोत्तराचा तास दुपारी १२:३१ वाजता सुरु झाला व दुपारी ०१:३१ वाजता संपला. वेळेअभावी प्रश्न क्र.२२ ते ३० त्यावरील उपप्रश्न विचारता आले नाहीत.**
**ब) प्रश्नोत्तराच्या तासामध्ये विचारलेले प्रश्न, उपप्रश्न व त्यावर देण्यात आलेली उत्तरे याची प्रत सोबत जोडली आहे (जोडपत्र "अ")**

## [ ३ ] विद्यापीठाचे सन २०१३-१४ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१४-१५ च्या मूळ अंदाजपत्रकाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.

डॉ. श्रीमती एस. आर. याजमान्य यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने खालील प्रस्ताव सादर केलेला आहे.

"ही अधिसभा वित्त व लेखा समितीने व व्यवस्थापन परिषदेने दुरुस्तीसह केलेल्या शिफारशी विचारात घेवून असा ठराव करते की, व्यवस्थापन परिषदेने सन २०१३-१४ च्या सुधारीत अंदाजपत्रक व २०१४-१५ च्या मूळ अंदाजपत्रकाबाबत केलेली शिफारशी मान्य करुन मंजूर करण्यात याव्यात".

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७५ (२) (e) आणि १०१ नुसार विद्यापीठाचे सन २०१३-१४ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१४-१५ चे मूळ अंदाजपत्रक तयार करण्याकरीता महाराष्ट्र विद्यापीठे समान लेखा संहिता कलम २.१२ नुसार खालीलप्रमाणे अर्थसंकल्प उपसमिती गठीत करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १) | प्रा. डॉ. एस. व्ही. लोणीकर | सदस्य |
| २) | श्री. बी. आर. गायकवाड | सदस्य |
| ३) | प्रा. डॉ. ए. ए. शेख | सदस्य |
| ४) | श्री. एस. बी. अनपट | सचिव |

सदर उपसमितीने तयार केलेले सन २०१३-१४ चे सुधारीत अंदाजपत्रक व २०१४-१५ चे मूळ अंदाजपत्रक वित्त व लेखा समितीच्या दि.०४/०२/२०१४ रोजी झालेल्या बैठकीसमोर विषय क्र. ०३ नुसार सादर केले असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

| | |
|---|---|
| ठराव : | सन २०१३-१४ च्या सुधारीत अंदाजपत्रकास व सन २०१४-१५ च्या मूळ अंदाजपत्रकास दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. |

वरीलप्रमाणे वित्त व लेखा समितीची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या दि.१३/०२/२०१४ रोजी झालेल्या बैठकीत विषय क्र. ०७ अन्वये विचारार्थ सादर केली असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

| | |
|---|---|
| ठराव : | विद्यापीठाचे सन २०१३-१४ चे सुधारीत अंदाजपत्रक व २०१४-१५ च्या मूळ अंदाजपत्रकास व्याकरणाच्या व स्पेलिंगच्या दुरुस्तीसह सर्वानुमते अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली. |

व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार अंदाजपत्रकातील व्याकरणाच्या व स्पेलिंगच्या दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत.

सबब, विद्यापीठाचे सन २०१३-१४ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१४-१५ च्या मूळ अंदाजपत्रकाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

**ठरावः सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यास प्राचार्य श्री. जमादार के. एम. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर खालील अधिसभा सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले.**

**१) डॉ. रोंगे बी. पी.**
**२) प्राचार्य डॉ. फरताडे एम. एम.**
**३) डॉ. चव्हाण सी. एस.**
**४) डॉ. बचुटे एम. टी.**
**५) डॉ. गायकवाड एस. पी.**
**६) श्री. सलगर बी. एस.**
**७) श्री. रिसबूड एस. एच.**
**८) डॉ. पवार एन. बी.**
**९) प्राचार्य डॉ. हलकुडे एस. ए.**
**१०) प्राचार्य डॉ. शेंडगे आर. एन.**
**११) प्राचार्य डॉ. देशमुख ए. एल.**
**१२) डॉ. शिंदे एस. व्ही.**
**१३) डॉ. शिळीमकर टी. एन.**

**त्यानंतर सदर प्रस्ताव एकमताने मान्य करण्यात आला.**

**[ ४ ] महाराष्ट्र शासनाच्या दि.१४ सप्टेंबर, २००९ च्या आदेशानुसार आणि वेळोवेळी प्राप्त शुध्दीपत्रानुसार विविध अधिकार मंडळाचे सदस्य होण्यासाठी विहीत केलेल्या निकषांचा परिनियमामध्ये समाविष्ट करण्यासाठी परिनियम समितीने पुर्नविचार करुन शिफारस केलेले परिनियम क्रमांक SUSS.301 ते SUSS.386, परिशिष्ट III, IV, V आणि दीक्षांत सदंर्भातील परिनियम क्र.SUSS.387 ते SUSS.390 स्विकारुन व्यवस्थापन परिषदेने मान्यतेची पुनश्चः केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: महाराष्ट्र शासनाच्या दि.१४ सप्टेंबर, २००९ रोजीच्या शासन राजपत्रानुसार आणि वेळोवेळी प्राप्त शुध्दीपत्रानुसार विविध अधिकार मंडळाचे सदस्य होण्यासाठी विहीत केलेल्या निकषांचा परिनियमामध्ये समाविष्ट करण्यासाठी परिनियम समितीने दि.१७/०२/२०१२ च्या बैठकीत तयार केलेले परिनियम क्रमांक SUSS.301 ते SUSS.387, परिशिष्ट III, IV, V आणि दीक्षांत सदंर्भातील परिनियम क्र.SUSS.388 ते SUSS.391 व्यवस्थापन परिषदेस सादर केले होते. व्यवस्थापन परिषदेने दि.०२/०३/२०१२ च्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार त्यापैकी काही परिनियम अधिसभेस मान्यतेकरिता शिफारस केले होते. अधिसभेने दि.२४/०३/२०१२ च्या बैठकीत उक्त परिनियम पुनश्चः विचारार्थ व्यवस्थापन परिषदेस पाठविले. व्यवस्थापन परिषदेने हे परिनियम दि.१६/१०/२०१२ च्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार परिनियम समितीच्या पुनश्चः विचारार्थ पाठविले. परिनियम समितीने या परिनियमांबाबत दि.३/१/२०१४ रोजी झालेल्या बैठकीत दि.१४/९/२००९ च्या शासन आदेशातील तरतूदी, त्यानंतर त्यात झालेले विविध बदल विचारात घेऊन आवश्यक त्या दुरुस्त्या करुन हे परिनियम व्यवस्थापन परिषदेकडे पाठविले.

व्यवस्थापन परिषदेने दि.१३/०२/२०१४ रोजीच्या बैठकीत उक्त परिनियम मान्यतेसाठी अधिसभेस शिफारस केले आहेत. ठराव खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्र.२४ | महाराष्ट्र शासनाच्या दि.१४ सप्टेंबर, २००९ च्या आदेशानुसार आणि वेळोवेळी प्राप्त शुध्दीपत्रानुसार विविध अधिकार मंडळाचे सदस्य होण्यासाठी विहीत केलेल्या निकषांचा परिनियमामध्ये समावेश करण्यासाठी परिनियम समितीने पुर्नविचार करुन शिफारस केलेले परिनियम क्रमांक SUSS.301 ते SUSS.386, परिशिष्ट III, IV, V आणि दीक्षांतसंदर्भातील परिनियम क्र.SUSS.387 ते SUSS.390 स्विकारुन अधिसभेस मान्यतेची सर्वानुमते शिफारस करण्यात आली. |

सबब, महाराष्ट्र शासनाच्या दि.१४ सप्टेंबर, २००९ च्या आदेशानुसार आणि त्यात वेळोवेळी प्राप्त झालेल्या शुध्दीपत्रानुसार विविध अधिकार मंडळाचे सदस्य होण्यासाठी विहीत केलेल्या निकषांचा परिनियमामध्ये समाविष्ट करण्यासाठी परिनियम समितीने पुर्नविचार करुन शिफारस केलेले परिनियम क्रमांक SUSS.301 ते SUSS.386, परिशिष्ट III, IV, V आणि दीक्षांत सदंर्भातील परिनियम क्र.SUSS.387 ते SUSS.390 व्यवस्थापन परिषदेने स्विकारुन अधिसभेस मान्यतेसाठी केलेली शिफारस विचारार्थ).

**ठरावः सदरचा प्रस्ताव अध्यक्षांनी मांडल्यानंतर या विषयावर अधिसभा सदस्य**

**१) प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. ४) डॉ. कदम डी. जी.**

**२) डॉ. अवताडे एच. के. ५) डॉ. पवार एन. बी.**

**३) डॉ. भिलेगावकर एस. डी. ६) डॉ. एम. कृष्णमूर्ती, यांनी आपले विचार मांडले आणि दीक्षांत संदर्भातील परिनियम SUSS.389 मध्ये, विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यापीठ अनुदान आयोग कायदा, १९५६ मधील कलम २२ नुसार विहीत केलेल्या आणि शिवाजी विद्यापीठाच्या परिनियमामध्ये उल्लेख केलेल्या पदव्यांची नावे समाविष्ट करुन प्रस्ताव सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**[ ५ ] अधिसभा सदस्य डॉ. रोंगे बी. पी. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

सोलापूर विद्यापीठाच्या संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांनी महाविद्यालयांना *'महाविद्यालयात सुरू असणाऱ्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविण्यासाठी पदमान्यतेनुसार सर्व शिक्षकांची पदे विद्यापीठ निवड समिती मार्फत नियमित रित्या भरणेबाबत....'* या विषयास अनुसरून पाठविलेले पत्र क्र.सोविसो/मविविमं/संलग्नता/७७९९ दिनांक १५/०१/२०१४ मधील विद्यापीठाने घेतलेला *"तसेच आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, शै. वर्ष २०१४-१५ करीता आपल्या महाविद्यालयात सुरू असणाऱ्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास विद्यापीठ निवड समितीमार्फत नियुक्त केलेल्या शिक्षकांच्या प्रमाणातच विद्यार्थी प्रवेश देण्याबाबत तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना कळविण्यात येणार आहे व तेवढयाच विद्यार्थ्यांची पात्रता विद्यापीठाकडून केली जाईल व परीक्षा घेतली जाईल या उपरोक्त जर महाविद्यालयांनी अतिरिक्त विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यास सदर विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस सर्वस्वी आपण जबाबदार असाल"* हा निर्णय मागे घेण्यात यावा अशी शिफारस ही अधिसभा विद्यापरिषदेस करीत आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. रोंगे बी. पी. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ ६ ] अधिसभा सदस्य डॉ. रोंगे बी. पी. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

विद्यापीठाच्या आदेश किंवा सुचनेनुसार विद्यापीठाच्या कामासाठी तीन लोक कार वापरणार असतील तर त्यांना त्यासाठी विद्यापीठाच्या पूर्व परवानगीची गरज असणार नाही अशी दुरूस्ती नियमात करावी अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास श्री. गायकवाड एस. पी. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

**[ ७ ] अधिसभा सदस्य श्री. देशपांडे ए. व्ही. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

विद्यापीठाच्या आदेश किंवा सुचनेनुसार विद्यापीठाच्या कामासाठी विद्यापीठाचे आजी व माजी अधिष्ठाता व माजी व्यवस्थापन परिषद सदस्य तसेच माजी संचालक, बी.सी.यु.डी., माजी कुलसचिव, माजी परिक्षा नियंत्रक व माजी वित्त व लेखा अधिकारी यांना कार वापरण्याची परवानगी असावी तसेच त्यासाठी पूर्व परवानगीची गरज नसावी असा नियम करावा अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. शिंदे एस. व्ही. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत श्री. देशपांडे ए. व्ही. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ ८ ] अधिसभा सदस्य श्री. देशपांडे ए. व्ही. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

पीएच. डी. गाईड म्हणून विद्यापीठाची मान्यता मिळण्यासाठी पीएच.डी. नंतर तीन वर्षाच्या कालावधीची अट रद्द करण्यात यावी अशी शिफारस ही अधिसभा विद्यापरिषदेस करीत आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. रोंगे बी. पी. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

**[ ९ ] अधिसभा सदस्य डॉ. कोळेकर टी. एन. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस अशी शिफारस करते की, सोलापूर विद्यापीठ सोलापूर चे General Statute लवकरात लवकर अधिसभेच्या मान्यतेसाठी व मा. कुलपतींना मान्यतेची शिफारस करणेसाठी सादर करावे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. अवताडे एच. के. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

**[ १० ] अधिसभा सदस्य डॉ. कोळेकर टी. एन. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस अशी शिफारस करते की, विद्यापीठाच्या मा. कुलगुरुंचे निवासस्थान व मा. कुलसचिव यांचे निवासस्थान विद्यापीठ परिसरात लवकरात लवकर बांधावे.

**ठरावः सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास श्री. गायकवाड आर. एस. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

**[ ११ ] अधिसभा सदस्य श्री. गायकवाड एस. पी. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

नियत वयोमानानुसार ६० वर्षी महाविद्यालयातून निवृत्त होणाऱ्या शिक्षकांचे प्रस्ताव (६२ वर्षा पर्यंत सेवा चालू ठेवण्याचे) संबंधीत संस्थेने निवृत्तीपूर्वी ६ महिने आगोदर, विद्यापीठाकडे पाठवावेत अशी सूचना देणारे पत्र संचालक, बी. सी. यु. डी. यांने पाठवावे अशी शिफारस ही अधिसभा बी. सी. यु. डी. ला करीत आहे.

**ठरावः सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. भोसले यु. व्ही. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत श्री. गायकवाड एस. पी. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ १२ ] अधिसभा सदस्य डॉ. कदम आर. डी. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

डी. आर. सी. (D.R.C.) च्या मिटिंगमध्ये संशोधक मार्गदर्शकाकडे संशोधक विद्यार्थ्यांचे वाटप झाल्यानंतर शोध- प्रबंधाची रुपरेखा तयार करण्यासाठी एक महिन्याच्या ऐवजी तीन महिन्याच्या कालावधीची शिफारस ही अधिसभा मा. संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळास करीत आहे.

**ठरावः सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. भिलेगावकर एस. डी. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. कदम आर. डी. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ १३ ] अधिसभा सदस्य डॉ. आवताडे एच. के. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

विद्यापीठ परीक्षेसाठी या पूर्वी दोन भरारी पथके नियुक्त करण्यात येत होती. परंतु गेल्या दोन सत्रापासून एकच भरारी पथक नेमण्यात येत आहे. तरी पूर्वी प्रमाणे दोन भरारी पथके नेमावित अशी शिफारस ही अधिसभा परीक्षा मंडळास करीत आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. कोळेकर टी. एन. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

**[ १४ ] अधिसभा सदस्य डॉ. सौ. दळवी आर. जे. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

शिक्षणशास्त्र विद्याशाखेचा एक वर्षिय कालावधीच्या बी.एड्., बी.पी.एड्., एम.एड्., अभ्यासक्रमास सत्र पध्दती ऐवजी वार्षिक परीक्षा पध्दतीचा अवलंब करावा. अशी शिफारस ही अधिसभा परीक्षा मंडळास करीत आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. शिंदे एस. व्ही. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. सौ. दळवी आर. जे. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ १५ ] अधिसभा सदस्य डॉ. आवताडे एच. के. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

'स्कूल ऑफ इंग्लिश ॲण्ड फॉरिन लॅग्विंजीस्' व 'स्कूल ऑफ मराठी, हिंदी व इंडियन लॅग्विंजीस' हे स्कूल अनुदानीत तत्वावर सुरु करण्याची शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास श्री. गायकवाड आर. एस. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. आवताडे एच. के. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ १६ ] अधिसभा सदस्य श्री. गायकवाड एस. पी. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

संशोधक विद्यार्थ्यांची वार्षिक फी दोन स्वतंत्र सत्रामध्ये घेण्यात यावी अशी शिफारस ही अधिसभा विद्यापरिषदेला करीत आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. भोसले यु. व्ही. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत श्री. गायकवाड एस. पी. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ १७ ] अधिसभा सदस्य डॉ. सौ. दळवी आर. जे. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

प्रथम वर्ष पदवी वर्गास असणारी सक्तीची शारिरीक शिक्षण परीक्षा पहिल्या सत्रा दरम्यान घेण्यात यावी व त्याचा लाभ प्रथम तसेच द्वितीय सत्रांच्या निकालामध्ये आवश्यकतेनुसार देण्यात यावा अशी शिफारस ही अधिसभा परीक्षा मंडळास करीत आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. कोळेकर टी. एन. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. सौ. दळवी आर. जे. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ १८ ] अधिसभा सदस्य डॉ. शिंदे एस. व्ही. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

सोलापूर विद्यापीठामध्ये COMMERCE AND MANAGEMENT हा अधिविभाग अनुदानीत तत्वावर सुरु करण्याची शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेकडे करीत आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. शिंदे एस. व्ही. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ १९ ] अधिसभा सदस्य श्री. गायकवाड आर. एस. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

विद्यापीठातील विद्यार्थी व इतरांच्या सोयी साठी सोलापूर विद्यापीठाच्या परिक्षेत्रात अधिकृत बस थांबा सुरु करण्यासाठी ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस शिफारस करीत आहे.

ठराव: **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. पवार एन. बी. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

**[ २० ] अधिसभा सदस्य श्री. कांबळे एन. आर. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

विद्यापीठ परिक्षा चालू असताना कॅप सेंटरवर पेपरचे गठ्ठे पोहोचविण्यासाठी १०० पेपरच्या पुढे एक शिपाई देण्यात यावा. अशी शिफारस ही अधिसभा परिक्षा मंडळाकडे करीत आहे.

ठराव: **अधिसभा सदस्य श्री. कांबळे एन. आर. या बैठकीस अनुपस्थित होते. त्यांच्या वतीने सदरचा ठराव कोणत्याही सदस्याने न मांडल्याने हा ठराव वगळण्यात आला.**

**[ २१ ] अधिसभा सदस्य डॉ. चव्हाण सी. एस. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

राजीव गांधी अथवा मौलाना आझाद संशोधन शिष्यवृत्ती मिळालेल्या संशोधक विद्यार्थ्यांना इतर विद्यार्थ्यांप्रमाणेच फी / शुल्क आकारण्यात यावे अशी शिफारस ही अधिसभा विद्या परिषदेस करित आहे.

ठराव: **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. रोंगे बी. पी. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

**[ २२ ] अधिसभा सदस्य डॉ. चव्हाण सी. एस. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

राष्ट्रीय सेवा योजना, एन. सी. सी. सांस्कृतिक तसेच क्रिडा विभागातील विद्यापीठ परिक्षेत्रातील महाविद्यालयातील जे विद्यार्थी राज्यस्तरीय शिबीर व स्पर्धामध्ये सहभागी होतात त्यांना एखाद्या विषयास उत्तीर्ण होण्यास १० गुण देण्याची शिफारस ही अधिसभा विद्या परिषदेस करित आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. भोसले यु. व्ही. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. चव्हाण सी. एस. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

**[ २३ ] अधिसभा सदस्य डॉ. चव्हाण सी. एस. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

अंतीम संशोधन प्रबंध विद्यापीठास सादर केल्यानंतर तो दोन महिण्याच्या आत परिक्षणाकरिता पाठविण्याचा नियम बंधनकारक करावा अशी शिफारस ही अधिसभा विद्या परिषदेस करित आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास प्राचार्य डॉ. फरताडे एम. एम. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. चव्हाण सी. एस. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **कुलसचिव** | **मा. कुलगुरु** |
| **सचिव, अधिसभा** | **अध्यक्ष, अधिसभा** |

**जोडपत्र "अ"**

## विषय क्र. ०२ चे सहपत्र

## अधिसभेच्या शनिवार, दि.१५ मार्च २०१४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये प्रश्नोत्तराच्या तासामध्ये अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न, उपप्रश्न व त्यावर देण्यात आलेली उत्तरे

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | **डॉ. कोळेकर टी. एन.** | **प्राचार्य श्री. पवार एस. के.** |
| १ | मा. कुलगुरुंना विद्यापीठ कायदा १९९४ प्रमाणे पुरविलेल्या निवासस्थानाचा आकार, दरमहा भाडे, दरमहाचे विद्युत देयक व सदर निवासस्थान भाडयाने घेण्यासाठी विद्यापीठाने घरमालकाकडे ठेवलेली Deposit किती आहे? | • निवासस्थानाचे क्षेत्रफळ ३०९.८७ चौ. मी.<br>• दरमहा भाडे रु.२२,०००/-<br>• विद्युत देयक वापरानुसार<br>• डिपॉझिटची रक्कम रु.५०,०००/- |
| • | विद्यापीठ परिसरामध्ये कुलगुरुंचे निवासस्थान केव्हा बांधणार? | याबाबत आपण मास्टर प्लॅन तयार केलेला आहे आणि ४८२ एकरामध्ये निवासस्थान बांधण्याचं आपण प्रलंबित केलेले आहे. याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. मंजूर झाल्यानंतर बांधकाम चालू करण्यात येईल. |
| | | |
| २ | सोलापूर विद्यापीठाच्या सलग्नीत महाविद्यालया तील मान्यता प्राप्त संशोधन केंद्रातील संशोधक मार्गदर्शकांना कोण कोणत्या सोयी सुविधा पुरवल्या जातात? | विद्यापीठ ग्रंथालयातील व इन्स्ट्रूमेंट सेंटरमधील सोयीसुविधा पुरविल्या जातात. |
| | | |
| ३ | सन २००८-०९ ते २०१२-१३ या कालावधीत प्रमाद समीतीने कोणास किती दंड केलेला आहे व कोणाचा दंड व शिक्षा माफ केलेली आहे? | सन २००८-०९ ते २०१२-१३ या कालावधीत प्रमाद समितीने शिक्षकास दंड व शिक्षा माफ केल्याचे सहपत्र सोबत जोडलेले आहे. (सदर सहपत्र दि.०७/०३/२०१४ च्या पत्रासोबत यापूर्वीच पाठविण्यात आलेले आहेत). |
| | | |
| | **डॉ. भोसले यु. व्ही.** | **प्राचार्य श्री. पवार एस. के.** |
| ४ | कोण-कोणत्या महाविद्यालयात नियमित प्राचार्य पद भरलेले नाही? | |
| उत्तर | **अनुदानित महाविद्यालयातील रिक्त प्राचार्यांची यादी.** | |

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नांव |
|---|---|
| १. | श्री. संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा |
| २. | संगमेश्वर कॉलेज, सात रस्ता, सोलापूर |
| ३. | भाई छन्नुसिंग चंदेले कॉलेज ऑफ सोशल वर्क, सोलापूर |
| ४. | बी. पी. सुलाखे कॉलेज, बार्शी |
| ५. | डी. बी. एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर |
| ६. | डी. ए. व्ही. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर |

| | | |
|---|---|---|
| | ७. | प्रतापसिंह मोहिते-पाटील महाविद्यालय, करमाळा |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | **कायम विना अनुदानित महाविद्यालयातील रिक्त प्राचार्यांची यादी.** | |
| | १. | कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, वैराग, ता. बार्शी |
| | २. | कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, उजनी कॉलनी, सोलापूर |
| | ३. | कर्मवीर औदुंबर पाटील विधी महाविद्यालय, पंढरपूर |
| | ४. | कर्मयोगी बबनरावजी शिंदे महाविद्यालय, कुर्डूवाडी |
| | ५. | गांधीनाथा रंगजी बीसीए महाविद्यालय, सोलापूर |
| | ६. | सिंहगड स्कूल ऑफ कॉम्प्युटर स्टडीज, केगांव, सोलापूर |
| | ७. | सिंहगड बिझनेस स्कूल, केगांव, सोलापूर |
| | ८. | कै. आमदार काकासाहेब साळुंके-पाटील आर्टस् ॲन्ड सायन्स कॉलेज, जवळे |
| | ९. | के. पी. मंगळवेढेकर इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंन्ट डेव्हलपमेंट ॲन्ड रिसर्च, सोलापूर |
| | १०. | श्रीमान भाऊसाहेब झाडबुके शिक्षणशास्त्र महिला महाविद्यालय, बार्शी |
| | ११. | श्रीमान योगेश सोपल महाविद्यालय, पांगरी, ता. बार्शी |
| | १२. | श्री. स्वामी समर्थ शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी |
| | १३. | श्री. स्वामी समर्थ एम. एड. महाविद्यालय, बार्शी |
| | १४. | श्री. विठ्ठल एम.एड. कॉलेज, वेणुनगर (गुरसाळे), ता. पंढरपूर |
| | १५. | सोजर आर्टस ॲन्ड कॉमर्स कॉलेज, बार्शी, ता. बार्शी |
| | १६. | सनराईज कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, पंढरपूर, जि. सोलापूर |
| | १७. | समीर गांधी कला महाविद्यालय, माळशिरस |
| | १८. | भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव, सोलापूर |
| | १९. | रुक्मिणी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, चळे, ता. पंढरपूर |
| | २०. | रुक्माई इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर |
| | २१. | जय जगदंबा बी.सी.ए. महाविद्यालय, वैराग, ता. बार्शी |
| | २२. | जय जगदंबा वरिष्ठ विज्ञान महाविद्यालय, वैराग, ता. बार्शी |
| | २३. | जय जगदंबा एज्युकेशन महाविद्यालय, वैराग, ता. बार्शी |
| | २४. | जय जगदंबा एम.एड. महाविद्यालय, वैराग, ता. बार्शी |
| | २५. | न्यु सातारा कॉलेज ऑफ बी.सी.ए. पंढरपूर |
| | २६. | न्यु सातारा कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, कोर्टी, ता. पंढरपूर |
| | २७. | यशवंतभाऊ पाटील महाविद्यालय, भोसे, ता. पंढरपूर |
| | २८. | विश्वेश्वरैय्या वाणिज्य महाविद्यालय, मंगळवेढा |
| | २९. | दिलीप कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन, खांडवी, जि. सोलापूर |
| | ३०. | लोकमंगल बायो-टेक्नॉलॉजी कॉलेज, वडाळा, ता. उत्तर सोलापूर |
| | ३१. | एन.बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव, सोलापूर |
| | ३२. | एस.के.एन. सिंहगड बिझनेस स्कूल, कोर्टी, ता. पंढरपूर |
| | ३३. | ए. जी. पाटील इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोरेगाव, सोलापूर |
| | ३४. | शरदचंद्र पवार कला वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर |
| | ३५. | राजीवजी गांधी बी.ए.बी.एड. महाविद्यालय, वैराग, ता. बार्शी |
| | ३६. | रणजितसिंह मोहिते पाटील महाविद्यालय, करमाळा |
| | ३७. | मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेटी कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, अक्कलकोट |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ● | प्राचार्य पद भरण्याची प्रक्रिया संबंधित महाविद्यालयांनी काय केली आहे? | १ ते ७ ही अनुदानित आहेत व उर्वरित विना अनुदानित आहेत.<br>१) संत दामाजी महाविद्यालयाचे प्राचार्य पद दि.२४/३/१३ रोजी रिक्त झाले आहे. न्यायालयीन प्रकरण चालू असल्याने प्रक्रिया थांबलेली आहे.<br>२) संगमेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य पद दि.३१/१०/१३ रोजी पद रिक्त झाले आहे. जाहिरात एक वेळ दिली आहे. प्राचार्य पद भरण्याची प्रक्रिया सुरु आहे.<br>३) भाई छन्नुसिंग चंदेले कॉलेज ऑफ सोशल वर्क, सोलापूर या महाविद्यालयातील प्राचार्य पद खुल्या प्रवर्गातील आहे. दि.२०/५/११ रोजी रिक्त झाले. एक वर्षाकरिता मान्यता होती ती दि.२०/५/११ रोजी संपली आहे. पीएच.डी. प्राप्त उमेदवार उपलब्ध झालेला नाही. प्राचार्य पद भरण्याची कार्यवाही सुरु आहे.<br>४) बी. पी. सुलाखे कॉलेज ऑफ कॉमर्स, बार्शी या महाविद्यालयाचे पद अनुसूचित जातीकरिता राखीव आहे. पद दि.३१/०३/११ रोजी रिक्त झाले. न्यायालयीन प्रकरणामुळे प्रक्रिया थांबलेली आहे.<br>५) डी. बी. एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयाचे प्राचार्य पद अनुसूचित जमातीकरिता राखीव आहे. हे पद दि.१/११/०८ रोजी रिक्त झाले आहे. ९ वेळा जाहिरात देवूनही अनुसूचित जमातीचा उमेदवार मिळाला नाही. त्यामुळे पद रिक्त आहे.<br>६) डी. ए. व्ही. कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर या महाविद्यालयाचे प्राचार्य पद खुल्या प्रवर्गाकरिता राखीव आहे. दि.५/९/१२ रोजी पद रिक्त झाले. आतापर्यंत दोन वेळा जाहिरात दिली आहे. प्राचार्य पद भरण्याची प्रक्रिया सुरु आहे.<br>७) प्रतापसिंह मोहिते पाटील महाविद्यालय करमाळा या महाविद्यालयाचे प्राचार्य पद अनुसूचित जाती करिता राखीव आहे. ४ वेळा जाहिरात देवूनही उमेदवार मिळाला नाही. त्यामुळे प्राचार्य पद रिक्त आहे. |
| ● | न्यायालयीन प्रक्रिया असल्याने संत दामाजी महाविद्यालय मंगळवेढा या महाविद्यालयाचे प्राचार्य पद भरण्याबाबत न्यायालयाची स्थगिती आहे का? | न्यायालयीन आदेशानुसार प्रभारी प्राचार्य पदास मान्यता दिली आहे.<br>संबंधित महाविद्यालयाने न्यायालयात जावून नियमित प्राचार्य भरण्याकरिता परवानगी घेणे आवश्यक आहे. परवानगी मिळाल्यानंतर नियमित प्राचार्य पद भरण्यास परवानगी देण्यात येईल. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ● | एखाद्या महाविद्यालयामध्ये नियमित प्राचार्य भरला गेला नाही तर जो काही सेवाजेष्ठ प्राध्यापक आहेत त्यांना प्रभारी प्राचार्य पदाचा कार्यभार दिला जातो त्याला आपण मान्यता देतो अशी मान्यता सलग किती वर्ष देता येते त्याच प्राध्यापकाला? | असा काही नियम नाही ह्याच्यात फक्त ६ महिन्याकरिता प्रभारी प्राचार्य पदी नेमता येईल. |
| ● | डी. ए. व्ही. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स दुसरा प्राचार्य भरताना ज्या उमेदवारांनी अर्ज केला होता त्या उमेदवाराचा अर्ज अपात्र म्हणून घोषित केला त्याविषयीची तक्रार विद्यापीठाकडे आलेली होती. सदर महाविद्यालय हे विद्यापीठाचे आदेश पाळत नाही किंवा नियमानी काम करत नाही म्हणून आपण या महाविद्यालयावर काय कार्यवाही करणार? | तक्रार आल्यानंतर आपण संबंधित संस्थेकडून खुलासा मागवतो. आणि खुलासा आल्यानंतर संबंधित अधिकारमंडळासमोर ठेवतो व त्यावरील आदेशानुसार कार्यवाही करतो. |
| ● | यासंदर्भात संबंधित महाविद्यालयाच्या खुलास आलेला नाही का? | संबंधित महाविद्यालयांना खुलासा देण्याबाबत पत्र पाठविले आहे. |
| ● | महाविद्यालयामध्ये प्राचार्य पदाची छाननी करत असताना विद्यापीठाने असे काही नियम करुन दिलेत का की त्या आधारेच फक्त त्या समितीने त्या नियमांच्या आधारे छाननी करावी? | विद्यापीठाचे नियम नाहीत. UGC चे नियम आहेत ते पाळले पाहिजेत. |
| ● | एखाद्या महाविद्यालयात किती वर्षापर्यत प्राचार्याचे पद रिक्त ठेवले जाते? | Specific time नाही. याबाबत काही नियम नाहीत. |
| | | |
| ५ | सन २००९ ते २०१३ या कालावधीत प्रमाद समितीने कोण-कोणत्या परीक्षकांना शिक्षा व दंड आकारला होता? | प्रश्न क्र. ३ च्या उत्तराप्रमाणे. |
| | | |
| ६ | कोण-कोणत्या परीक्षकांना प्रमाद समितीने आकारलेला दंड माफ केलेला आहे? असल्यास कोणत्या कायदयाने? | प्रश्न क्र. ३ च्या उत्तराप्रमाणे. |
| ● | या व्यतिरिक्त अन्य काही शिक्षकांना दंड माफ केला आहे का? केला असल्यास त्यांची नावे द्यावी? | नाही. |
| ● | दंड झालेल्या काही शिक्षकांना परीक्षेचे काम देण्यात आले आहे का? | नाही. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्नह | उत्तर |
| --- | --- | --- |
| | <u>**डॉ. बाड डी. आर.**</u> | <u>**डॉ. शेख ए. ए.**</u> |
| ७ | सोलापूर विद्यापीठने विद्यापीठाच्या कार्य क्षेत्राबाहेरील संशोधक मार्गदर्शक कोण-कोणत्या विषयासाठी उपलब्ध करुन दिलेले आहेत? त्या विषयांची व संशोधक मार्गदर्शकांची यादी दयावी? | यादी सोबत जोडली आहे. (सदर यादी दि.०७/०३/२०१४ च्या पत्रासोबत यापूर्वीच पाठविण्यात आली आहे). |
| ● | बाहेरील मार्गदर्शकासाठी निकष काय आहे? | सोलापूर विद्यापीठाचे गाईडशिप देण्याचे जे निकष आहे तेच बाहेरील लोकांसाठी निकष आहे. |
| ● | एखाद्या मार्गदर्शकाला दिलेली गाईडशिप विद्यापीठाने काढून घेतली आहे का? | नाही. |
| ● | डॉ. एस. एस. कानडे यांची गाईडशिप कोणत्या कारणास्तव काढून घेतली? | आता सध्या इंग्रजी विषयाचे बरेचसे मार्गदर्शक आपल्या विद्यापीठात तयार झालेले आहेत. त्यामुळे आता इथे उपलब्ध असता बाहेरील मार्गदर्शकांना आता मान्यता देत नाहीत. सुरवातीच्यावेळी मान्यता दिलेली आहे. |
| ● | पीएच. डी. ची गाईडशिप म्हणून दिलेली मान्यता काढून घेता येते का? | विद्यापीठाचा नियम असा आहे की, तुमच्याकडचा पीएच. डी. चा विद्यार्थी पहिल्या दोन वर्षामध्ये enroll केला नसेल तर विद्यापीठाला अधिकार आहे की गाईडशिप काढून घेता येते. |
| ● | बाहेरच्या गाईडला मान्यता देताना किती गाईडला मान्यता द्यावी असा काही नियम किंवा काय ठरविण्यात आलेले आहे का? | आपल्या गरजेनुसार. विद्यापीठात मार्गदर्शक उपलब्ध होत नसेल तर बाहेरच्या गाईडला मान्यता देण्यात येते. |
| ● | यासंदर्भात विद्यार्थी आणि बाहेरचे गाईड त्यामध्ये काही रेशिओ आहे का? | आहे. बाहेरच्या मार्गदर्शकांसाठी आपण फक्त दोन विद्यार्थी Allot करतो. |
| ● | PET च्या परीक्षेमधून जे पात्र विद्यार्थी झालेले आहेत त्या पात्र विद्यार्थ्यांना सगळ्यांना जर गाईडची Allotment झाली नाही त्यासाठी आपण बाहेरच्या विद्यापीठातील गाईडची सोय करतो का? | प्रयत्न केला जातो. |
| ● | बाहेरच्या विद्यापीठातील मार्गदर्शकांचा जर अर्ज आला तर त्यावेळी गृहित धरुन त्या विद्यार्थ्यांची सोय करायला काय हरकत आहे का? | जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना संशोधन करण्याची संधी मिळावी. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | **श्री. गायकवाड एस. पी.** | **डॉ. शिळीमकर टी. एन.** |
| ८ | परीक्षा नियंत्रक पदासाठी कोणी - कोणी अर्ज केले होते? | परीक्षा नियंत्रक या पदासाठी खालील तीन उमेदवारांनी अर्ज केले होते.<br>१) डॉ. पाटील डी. व्ही., भोगावती महाविद्यालय, कुरुकली ता. करवीर, जि.कोल्हापूर.<br>२) श्री. कोकिला आर. एस., बी. २०३, पटणचेरु (एम), जि.मेहठक -५०२३०५.<br>३) डॉ. पवार एन. बी., सुलोचना निवास मित्र नगर, मंगळवेढा, जि. सोलापूर. |
| • | १० जानेवारीला मुलाखती झाल्यानंतर परत जाहिरात दिली का? | नाही. |
| • | प्रक्रिया केव्हा होणार? | परीक्षा नियंत्रक नेमण्याकरिता जाहिरात देण्याची प्रक्रिया पुन्हा चालू करण्यात येईल. |
| • | ३ उमेदवारांनी अर्ज केले होते त्यापैकी किती उमेदवार मुलाखतीस उपस्थित होते? | एकही नाही. एक उमेदवार प्राप्त होते, पण ते मुलाखतीला उपस्थित राहिले नाहीत. |
| | | |
| | **डॉ. भिलेगावकर एस. डी.** | **डॉ. सुर्यवंशी एस. एस.** |
| ९ | पीएच. डी. कोर्स वर्क एम् फिल् पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना सक्तीचा आहे असे ऑनलाइन सूचनांमध्ये नमूद केले आहे का? | नाही. |
| • | अशा विद्यार्थ्यांना पीएच.डी. प्रवेश घेताना कोर्स वर्क सक्तीचा आहे असे बीसीयुडी विभागातर्फे सांगितले जाते का? | नाही. |
| • | अशा विद्यार्थ्यांचा पीएच.डी. प्रबंध का सादर करुन घेतला जात नाही? | प्रश्न संदिग्ध आहे. |
| • | UGC च्या नियमामध्ये जे Entrance Examination देवून एम.फिल परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत. अशा सगळ्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांना पीएच.डी. ला PET मधून सूट द्यावी आणि कोर्सवर्क म्हणून सूट द्यावी अशी तरतूद आहे. आपल्या विद्यापीठाच्या या नियमावलीमध्ये अशी तरतूद आहे का? | आपल्या विद्यापीठामध्ये एम.फिल केलेल्या विद्यार्थ्यांना PET मधून सूट दिलेली आहे. |
| • | UGC च्या नियमामध्ये जी तरतूद आहे ती तरतूद आपल्या नियमामध्ये करणार आहोत का? | UGC चे जे नियम आहेत त्याप्रमाणेच आपल्या विद्यापीठाचे नियम केलेले आहेत. |
| • | एम.फिल च्या मुलांना कोर्सवर्क सक्तीचे आहे का? | एम.फिल. मध्ये ॲडमिशन घेतल्यावर कोर्सवर्क करणे सक्तीचे आहे. |

<table>
<tr><th>प्रश्न क्रमांक</th><th>प्रश्न</th><th>उत्तर</th></tr>
<tr><td>●</td><td>आपल्या विद्यापीठामध्ये पीएच.डी. कोर्सवर्कसाठी चार पेपर आहेत, पूर्वीची जे एम.फिल आहे ते तिन आहेत तर त्यांना equivalence धरता येतो का?</td><td>एम.फिल Degree पूर्ण केल्यानंतर पेपरचा संबंध उरत नाही.</td></tr>
<tr><td>●</td><td>विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर चुकीचे किंवा संदिग्ध आहे तर त्याच्यावर सिनेट मध्ये आता चर्चा व्हायला हवी?</td><td>संबंधितांना जी माहिती हवी आहे ती त्यांनी संबंधित कार्यालयात जावून घ्यावी व त्यानुसार पूर्तता करुन घ्यावी. प्रशासन त्यावर योग्य ती कार्यवाही करेल.</td></tr>
<tr><td>●</td><td>आपल्या विद्यापीठात ज्यांनी एम.फिल केलेले आहे त्यांना ह्या पीएच.डी. कोर्समधून सूट जाते किंवा त्यांना PET मधून सूट दिली जाते अशी सूट शिवाजी विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, मराठवाडा, अमरावती आणि नागपूर विद्यापीठ येथून एम.फिल केलेल्या Candidate दिली जाते का?</td><td>होय.</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td><u>श्री. शिंदे आर. बी. यांच्या वतीने श्री. चौगुले एस. एस.</u></td><td><u>डॉ. सुर्यवंशी एस. एस.</u></td></tr>
<tr><td>१०</td><td>२००८-२००९, २००९-२०१०, २०१०-२०११, २०११-२०१२ व २०१२-२०१३ या शैक्षणिक वर्षात भूगर्भ शास्त्र विभाग (Geology), ग्रामीण विकास विभाग (Rural Development), Applied Economics Department, Diploma in Museology, Diploma in Tourism या अभ्यासक्रमास किती विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता?</td><td>२००८-२००९, २००९-२०१०, २०१०-२०११, २०११-२०१२, २०१२-२०१३ या शैक्षणिक वर्षात भूगर्भ शास्त्र विभाग (Geology), ग्रामीण विभाग (Rural Development), Applied Economics Department, Diploma in Museology, Diploma in Tourism या अभ्यासक्रमास खालील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या प्रमाणे विद्यार्थी प्रवेश घेतले आहे.
<table>
<tr><th rowspan="2">अ. क्र.</th><th rowspan="2">अभ्यासक्रमाचे नाव</th><th colspan="5">अभ्यासक्रम वर्ष व प्रवेशित विद्यार्थी संख्या</th></tr>
<tr><th>२००८-०९</th><th>२००९-१०</th><th>२०१०-११</th><th>२०११-१२</th><th>२०१२-१३</th></tr>
<tr><td>१.</td><td>M.Sc Geology</td><td>१५+१७</td><td>४+७</td><td>४+६</td><td>२+४</td><td>१६+२</td></tr>
<tr><td>२.</td><td>Rural Development</td><td>१ + -</td><td>९+ ०</td><td>११+८</td><td>३+७</td><td>१९+३</td></tr>
<tr><td>३.</td><td>Applied Economics</td><td>१ + -</td><td>११+०</td><td>११+८</td><td>९+९</td><td>२०+९</td></tr>
<tr><td>४.</td><td>Diploma in Museology</td><td>३</td><td>३</td><td>०</td><td>५</td><td>४</td></tr>
<tr><td>५.</td><td>Tourism</td><td>८</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>१</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>●</td><td>Diploma in Museology आणि Tourism यांना १२-१३ ला ४ व १ ॲडमिशन झालेले आहेत तर यांच्यासाठी Faculty किती आहेत?</td><td>हे Diploma Course आहेत ह्यांना आपण कोणतीही Faculty नेमत नाही.</td></tr>
</table>

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ११ | कमी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यामुळे सन २०१३-२०१४ या वर्षात कोण-कोणते अभ्यासक्रम बंद करण्यात आले? | एकाही विद्यार्थ्याने प्रवेश न घेतल्यामुळे सन २०१३-१४ या वर्षात एम.ए. एज्युकेशन हा अभ्यासक्रम बंद करण्यात आला आहे. |
| ● | याव्यतिरिक्त कोणकोणते अभ्यासक्रम बंद केलेले आहेत? | कोणतेही अभ्यासक्रम बंद केलेले नाहीत. |
| ● | २०१३-१४ ला बी.ए. एज्युकेशनसाठी विद्यापीठातल्या वेगवेगळ्या महाविद्यालयांना किती विद्यार्थी होते आणि ती विद्यार्थी संख्या जर असेल तर त्यातल्या काही जणांनी किमान एम.ए. एज्युकेशनला प्रवेश घ्यावा आणि आपल्याला बंद करावयाला लागू नये यासाठी आपण काय निर्णय घेण्यात येईल? | एम.ए. एज्युकेशन हा कोर्स फक्त सोलापूर विद्यापीठात चालू केला होता. आपला रेग्युलर एम.एड. हा कोर्स आहे. आणि Under Graduate ला बी.एड. हे आपल्याला कोर्सेस आहेत. आपल्या Under Graduate बी.ए., बी.एड. हे कोर्स नाहीत. |
| ● | विद्यापीठात सुरु असलेला एम.बी.ए. हा कोर्स कोणत्या वर्षी बंद करण्यात आलेला आहे? | बंद करण्यात आलेला नाही. |
| | | |
| | **डॉ. बचुटे एम. टी.** | **प्राचार्य श्री. पवार एस. के.** |
| १२ | संशोधक मार्गदर्शकाकडे संशोधक विद्यार्थी देताना संशोधक मार्गदर्शकासाठी वयाची अट आहे काय? | वयाची अट आहे. |
| ● | संशोधक मार्गदर्शकाला वयाची अट किती आहे? | वयाची अट ६५ वर्षे आहे. |
| ● | संशोधक मार्गदर्शकासाठी देण्यासाठी कुठले नियम आणि Regulations आहेत? | नियम आणि Regulation Website वर उपलब्ध आहे. |
| ● | ६५ जे उत्तर दिलेलं आहे ते चुकीचं आहे ६० वर्ष पूर्ण असताना देखील आपण मार्गदर्शकांना विद्यार्थी देत नाही आणि ६० वर्षे पूर्ण झालेल्या संशोधक मार्गदर्शकांना विद्यार्थी देण्याचा प्रश्नच नाही? | नियम आहेच. |
| ● | ६५ वर्षाची अट सांगितलेली आहे हे विद्यार्थी देतानाचे आहे का त्यांचा कार्यकाल संपेपर्यत ६५ आहे? | कार्यकाल संपेपर्यंत. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १३ | सन २०१३-२०१४ या वर्षात ६० वर्ष पूर्ण करणाऱ्या कोण कोणत्या संशोधक मार्गदर्शकाकडे संशोधक विद्यार्थी दिलेली नाहीत? | **अ) शिक्षणशास्त्र विद्याशाखा-** १) डॉ. श्रीमती पवार व्ही. यु. **ब) विज्ञान विद्याशाखा -** १) डॉ. माणिकशेटे ए. एच. २) डॉ. अन्यापन्यावार आर. डब्ल्यु, ३) डॉ. नारायणपेठकर ए. बी., ४) डॉ. शिरश्याड व्ही. एस., ५) डॉ. कोनापुरे बी. एस.,६) डॉ. पाटील आर. आर., ७) डॉ. श्रीमती बावचकर एस. एन., ८) डॉ. पवार एस. ए., ९) डॉ. पडवळ एस. एल. **क) सामाजिकशास्त्रे विद्याशाखा-** १) डॉ. मोरे टी. एस., २) डॉ. रणवरे एच. एस. |
| ● | या मार्गदर्शकांना विद्यार्थी न देण्यास कारण काय आहे? | ज्या मार्गदर्शकाकडे २ वर्षापेक्षा कमी कालावधी आहे. त्यांना आपण मार्गदर्शक देत नाही कारण विद्यार्थ्यांची नंतर आम्हाला Change in guide द्या असे पत्र येतात आणि मग त्यावेळेस ६ महिन्याचे जे अहवाल आहे ते प्राप्त नसतात त्यामुळे आपण असं केलं की, ज्यांच्याकडे कमीत कमी २ वर्ष सर्व्हिस आहे त्यांनाचा आपण विद्यार्थी देवू Otherwise No. |
| ● | सुरुवातील वयाची अट ६५ असताना नियमामध्ये अशी तरतूद नाही की त्याला ६५ पूर्ण होताना म्हणजे कमीत कमी २ वर्ष अगोदर दिलं पाहिजे मग तिथं ६३ च असली पाहिजे? | नियमाला तुम्ही छेद देता, विद्यार्थी आणि त्याचा जो संशोधन मार्गदर्शक आहे त्याची तुम्ही सुविधा उपलब्ध आहे का नाही बघितलं पाहिजे का नको. |
| ● | विद्यार्थ्याला गाईड उपलब्ध होत नाहीत म्हणून क्वालिफाईड विद्यार्थी तसेच बसतात बाहेरच्या गाईडला इथं गाईड उपलब्ध आहेत म्हणून इथं देत नाहीत? | UGC नियमाप्रमाणे Allotment प्राप्त विद्यार्थी हे समितीने करायचे असते. |
| ● | ६० वर्षे पूर्ण झालेल्या शिक्षकांना पुढं ते आणखी २ वर्ष कमीत कमी सर्व्हिस मध्ये राहणार असतील तर आणि त्यांच्या महाविद्यालयाने त्यांची लॅब वापरायला द्यायची तयारी असेल तर त्यांना No objection दिले असेल तर अशा संशोधकांना पीएच.डी. गाईडला विद्यार्थी देणार का candidate देणार? | ६० ते ६२ होणार ह्याची मंजूरी आधी झालेली नसते. प्रत्येक शिक्षकाला ६२ ची परवानगी मिळेलच अस सांगता येत नाही. प्रस्ताव सादर करणे, नंतर त्याच्यावर आपल्याला शासनाकडे मंजुरी मिळणे आणि तोपर्यंत त्या संशोधकाची Tendency जी असेल ती संपलेली असते. |
| | | |
| १४ | सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ या वर्षात स्थायी समितीच्या किती बैठका झाल्या? | तीन |
| ● | एका वर्षात किती बैठका घेतल्या पाहिजेत? | आवश्यकतेनुसार. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | **<u>डॉ. आवताडे एच. के.</u>** | **<u>ॲड. श्री. सलगर बी. एस.</u>** |
| १५ | प्रा. डॉ. लोणीकर यांच्याकडे विद्यापीठ परीक्षा नियंत्रक पदाचा कार्यभार कोणत्या नियमानुसार दिला आहे? | शासन निर्णय क्र. संकीर्ण - २०१२ / (९/१२) / विशि-१ दि.१५ मार्च, २०१३ अनुषंगाने दि.०३/०९/२०१३ रोजीच्या जे.बी.व्ही.सी. च्या बैठकीतील विषय क्र. १० संदर्भात झालेली चर्चा व ठरावानुसार प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही., विभागप्रमुख पॉलिमर केमिस्ट्री विभाग, रसायनशास्त्र संकुल यांच्याकडे परीक्षा नियंत्रक पदाचा अतिरिक्त कार्यभार महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(१) अन्वये दिला आहे. |
| ● | जे.बी.व्ही.सी. च्या बैठकीत काय निर्णय झाला? | जे.बी.व्ही.सी. ची बैठक 03/09/2013 रोजी झाली. त्यात शिक्षण मंत्री, राजेश टोपे आणि सर्व Vice-Chancellor सगळे उपस्थित होते. त्यात शेवटी असं झालं श्री. टोपे Assured the House that the Higher and Technical Education Department would Re-Examine the G.R. and the suggestions made by the Vice-Chancellor may be taken in to the Consideration. |
| ● | Does the Decisions takan in the JBVC supercides the present G.R.? | No, that decision was for re-examine and amendment of G.R.<br>त्या मिटिंगमध्ये स्वत: गव्हर्नरसाहेब असतात, मुख्यमंत्री उपलब्ध असतात, एज्युकेशन मिनिस्टर, एज्युकेशन सेक्रेटरी असतात, त्यांच्या संमतीनेच हा निर्णय घेतलेला असतो. |
| ● | JBVC च्या बैठकीतील कार्यवृत्तांतानुसार निर्णय घेता येतो का? | JBVC चा कार्यवृत्तांत मान्य झाल्यानंतर तो कार्यवाही करिता विद्यापीठास आलेला असतो. |
| ● | या व्यतिरिक्त डॉ. लोणीकर सरांकडे कोणकोणत्या पदांचा कार्यभार आहे? | डॉ. लोणीकर हे इनचार्ज ग्रंथपाल आहेत. |
| ● | अनेक कमिटीवर डॉ. लोणीकर सर काम करत असताना परीक्षा नियंत्रक पदाचा महत्वाचा कार्यभार सांभाळू शकतात का? | हो, त्यांची कॅपॅसिटी आहे त्यामुळेच त्यांच्याकडे पदभार दिलेला आहे. |
| ● | डॉ. लोणीकर यांच्याकडे परीक्षा नियंत्रक पदाचा कार्यभार देताना मा. राज्यपालांची परवानगी घेतली आहे काय? | राज्यपाल महोदयांची परवानगी घ्यायची गरज नाही. |
| ● | या संदर्भात शिक्षण विभागाशी पत्रव्यवहार झालेला होता का? | दि.१/१/२०१४ रोजी मा. प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई यांना कळविण्यात आले आहे. |
| ● | परिक्षा नियंत्रकाची नेमणूक जी. आर. नुसार केली आहे का ? | नेमणूक केली नाही, फक्त कार्यभार देण्यात आला आहे. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर | | |
|---|---|---|---|---|
| १६ | विद्यापीठाच्या संवैधानिक अधिकाऱ्यांना पदभार देण्यासाठी काही निमय व शासन निर्णय आहेत काय? | आहेत. | | |
| १७ | API गुणदान पध्दती तपासणीतील शोध निबंध तपासण्यासाठी तज्ञांची समिती नेमली आहे काय? असल्यास समितीमध्ये कोण कोण आहेत? | होय, प्रा. डॉ. एस. व्ही. लोणीकर यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात आली होती.<br><br>१) प्रा. डॉ. एस. व्ही. लोणीकर, रसायनशास्त्र संकुल, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर — अध्यक्ष<br>२) प्रा. डॉ. एस. एस. सुर्यवंशी पदार्थविज्ञान संकुल, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर — सदस्य<br>३) डॉ. व्ही. पी. उबाळे डी. बी. एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर — सदस्य<br>परंतु सद्यस्थितीतील प्रा. डॉ. एस. व्ही. लोणीकर, यांचेकडे दिनांक ०१/०१/२०१४ पासून प्रभारी परीक्षा नियंत्रक पदाचा अतिरिक्त कार्यभार, विद्यापीठ प्रशासनाने सोपविला आहे. त्यांचेकडील अधिकच्या कामाचा भार पाहता व मा. कुलगुरु महोदय यांचेशी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने नव्याने API चे मुल्यांकन विद्यापीठ स्तरावर करणेकामी खालील प्रमाणे विषयनिहाय समिती गठीत करण्यात आलेली आहे.<br>**वाणिज्य विद्याशाखा: (विषय - वाणिज्य)** | | |
| | | १) | डॉ. ए. ए. शेख<br>प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य विद्याशाखा, सोलापूर विद्यापीठ, द्वारा / आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, माढा, जि. सोलापूर | अध्यक्ष |
| | | २) | डॉ. व्ही. पी. उबाळे<br>डी.बी.एफ दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर | सदस्य |
| | | ३) | डॉ. डी. डी. पुजारी<br>संगमेश्वर कॉलेज, सातरस्ता, सोलापूर | सदस्य |
| | | **विज्ञान विद्याशाखा: (विषय - भूगोल)** | | |
| | | १) | डॉ. डी. जी. कदम<br>अधिष्ठाता, विज्ञान विद्याशाखा, सोलापूर विद्यापीठ द्वारा / डी.बी.एफ दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर | अध्यक्ष |
| | | २) | डॉ. व्ही. पी. उबाळे<br>डी.बी.एफ दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर | सदस्य |
| | | ३) | डॉ. बी. आर. फुले<br>सांगोला कॉलेज, सांगोला | सदस्य |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर | | |
|---|---|---|---|---|
| | | **विज्ञान विद्याशाखाः (विषय - इलेक्ट्रॉनिक्स)** | | |
| | | १) | डॉ. डी. जी. कदम<br>अधिष्ठाता, विज्ञान विद्याशाखा, सोलापूर विद्यापीठ द्वारा / डी.बी.एफ दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर | अध्यक्ष |
| | | २) | डॉ. व्ही. पी. उबाळे<br>डी.बी.एफ दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर | सदस्य |
| | | ३) | डॉ. एस. एस. सुर्यवंशी<br>सोलापूर विद्यापीठ, सोलापूर. | सदस्य |
| | | **विज्ञान विद्याशाखाः (विषय - पदार्थविज्ञान)** | | |
| | | १) | डॉ. डी. जी. कदम<br>अधिष्ठाता, विज्ञान विद्याशाखा, सोलापूर विद्यापीठ द्वारा / डी.बी.एफ दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर | अध्यक्ष |
| | | २) | डॉ. व्ही. पी. उबाळे<br>डी.बी.एफ दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर | सदस्य |
| | | ३) | डॉ. एस. जी. होळीकट्टी<br>वालचंद कला व वाणिज्य महाविद्यालय, सोलापूर | सदस्य |
| | | **विज्ञान विद्याशाखाः (विषय - सूक्ष्मजीवशास्त्र)** | | |
| | | १) | डॉ. डी. जी. कदम<br>अधिष्ठाता, विज्ञान विद्याशाखा, सोलापूर विद्यापीठ द्वारा / डी.बी.एफ दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर | अध्यक्ष |
| | | २) | डॉ. व्ही. पी. उबाळे<br>डी.बी.एफ दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर | सदस्य |
| | | ३) | श्रीमती डॉ. एम. डी. चव्हाण<br>वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड सायन्स, सोलापूर | सदस्या |
| | | **विज्ञान विद्याशाखाः (विषय - रसायनशास्त्र)** | | |
| | | १) | डॉ. डी. जी. कदम<br>अधिष्ठाता, विज्ञान विद्याशाखा, सोलापूर विद्यापीठ द्वारा / डी.बी.एफ दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर | अध्यक्ष |
| | | २) | डॉ. व्ही. पी. उबाळे<br>डी.बी.एफ दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर | सदस्य |
| | | ३) | डॉ. एल. व्ही. निंबाळकर<br>शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर | सदस्य |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर | | |
|---|---|---|---|---|
| | | **कला व ललित कला विद्याशाखाः (विषय - मराठी)** | | |
| | | १) | डॉ. एन. बी. पवार<br>अधिष्ठाता, कला व ललित कला विद्याशाखा, सोलापूर विद्यापीठ द्वारा / श्री. संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा | अध्यक्ष |
| | | २) | डॉ. व्ही. पी. उबाळे<br>डी.बी.एफ दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर | सदस्य |
| | | ३) | डॉ. श्रीमती एस. एस. वडगबाळकर<br>ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर | सदस्या |
| | | **कला व ललित कला विद्याशाखाः (विषय - कन्नड)** | | |
| | | १) | डॉ. एन. बी. पवार<br>अधिष्ठाता, कला व ललित कला विद्याशाखा, सोलापूर विद्यापीठ द्वारा / श्री. संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा | अध्यक्ष |
| | | २) | डॉ. व्ही. पी. उबाळे<br>डी.बी.एफ दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर | सदस्य |
| | | ३) | डॉ. जी. एस. धबाले<br>सी. बी. खेडगीज् कॉलेज ऑफ अक्कलकोट,<br>ता. अक्कलकोट, जि. सोलापूर | सदस्य |
| | | **कला व ललित कला विद्याशाखाः (विषय - इंग्रजी)** | | |
| | | १) | प्राचार्या डॉ. श्रीमती एम. सी. रामनवमिवाले<br>यशवंतरराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा | अध्यक्षा |
| | | २) | डॉ. व्ही. पी. उबाळे<br>डी.बी.एफ दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर | सदस्य |
| | | ३) | डॉ. टी. एन. कोळेकर<br>डी.बी.एफ. दयांनद कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड सायन्स, सोलापूर | सदस्य |
| | | **सामाजिकशास्त्रे विद्याशाखाः (विषय - अर्थशास्त्र)** | | |
| | | १) | डॉ. व्ही. एच. निंबाळकर<br>अधिष्ठाता, सामाजिकशास्त्रे विद्याशाखा, सोलापूर विद्यापीठ द्वारा / ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर | अध्यक्ष |
| | | २) | डॉ. व्ही. पी. उबाळे<br>डी.बी.एफ दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर | सदस्य |
| | | ३) | डॉ. एस. एल. पाटील<br>सांगोला कॉलेज, सांगोला | सदस्य |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर | | |
|---|---|---|---|---|
| | | **सामाजिकशास्त्रे विद्याशाखा: (विषय - समाजशास्त्र)** | | |
| | | १) | डॉ. व्ही. एच. निंबाळकर<br>अधिष्ठाता, सामाजिकशास्त्रे विद्याशाखा, सोलापूर विद्यापीठ द्वारा / ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर | अध्यक्ष |
| | | २) | डॉ. व्ही. पी. उबाळे<br>डी.बी.एफ दयानंद कॉलेज ऑफ आर्टस अॅन्ड सायन्स, सोलापूर | सदस्य |
| | | ३) | डॉ. ई. एन. अशोककुमार<br>संचालक, समाजशास्त्रे संकुल, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | सदस्य |
| ● | प्रत्येक विद्याशाखांनुसार जी आता समिती गठीत केली आहे त्या प्रत्येक समितीमध्ये डॉ. उबाळे हे कॉमन सदस्य दिसताहेत त्याचे प्रयोजन काय? | डॉ. उबाळे कॉमन सदस्य प्रत्येक समितीत मुद्दाम ठेवले आहेत, क्वॉलिफिकेशन ऑफ द कॅन्डीडेट आणि त्यांची जी तपासणी आहे ती सगळया समितीत व्यवस्थित व सारख्या प्रमाणात व्हावी यामुळे त्यांना ठेवलेले आहे. | | |
| ● | यामुळे प्रोफेसरची व अन्य पदे भरण्याकरता विलंब होत आहे, त्याकरिता टाईम टेबल आहे का? | विलंब अजिबात होत नाहीत. प्रक्रिया व्यवस्थित चालू आहे. | | |
| ● | API समिती नेमताना त्याचे निकष काय आहेत? | संबंधित विद्याशाखेचे डीन अध्यक्ष आहेत व डॉ. उबाळे अॅडमिनिस्ट्रेशन व नियमांची माहिती असल्याने त्यांची व संबंधित विषयाचा एक्स्पर्ट त्यामध्ये घेतलेला आहे. | | |
| ● | शिक्षणशास्त्र विद्याशाखेला API गुणदान पध्दतीची आवश्यकता नाही काय? | अर्ज आल्यानंतर समिती स्थापन करण्यात येईल. | | |
| ● | शिक्षणशास्त्र व ग्रंथपाल या विषयाचे डिटेलिंग केले नाही का? | नाही | | |
| ● | प्राचार्य पदाचे गुणदान याच समितीकडून करायचे का? | याकरिता वेगळी समिती आहे. | | |
| ● | समाजशास्त्र कोणकोणत्या विषयाला समिती नेमलेली नाही? | यादीतील विषयांकरिता नेमलेली आहे, यादीत नसलेल्या विषयांना समिती नेमलेली नाही. | | |
| | | | | |
| | **डॉ. शिंदे एस. व्ही.** | **प्राचार्य श्री. धुत्तरगाव एस. सी.** | | |
| १८ | UGC च्या १२(B) च्या तज्ञ समितीने सोलापूर विदयापीठास कोणत्या शिफारशी केल्या आहेत? | UGC च्या १२B तज्ञ समितीने केलेल्या सूचनाची छायांकित प्रत या सोबत जोडली आहे. (सदर प्रत दि.०७/०३/२०१४ च्या पत्रासोबत यापूर्वीच पाठविण्यात आली आहे). | | |
| ● | सूचना व शिफारशी एकच आहेत का? | एकच. | | |
| ● | पान क्र. २५ वर अ.क्र.२९ चा अर्थ काय? | अर्थ स्वयंस्पष्ट आहे, समितीने विद्यापीठात संकुले असल्याने पद मागणीकरिता अडचणी येत आहेत. त्यामुळे प्रत्येक विभागाला १ प्राध्यापक, २ सहयोगी प्राध्यापक व ४ किंवा त्यापेक्षा जास्त सहायक प्राध्यापक मिळायला हवेत. या करिता शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे. १७ विभागांकरिता आवश्यक पदे मागितले आहेत. पहिल्या वर्षी १+१+२ व दुसऱ्या वर्षी ०+१+२ असे मागणी करण्यात येणार आहेत. | | |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ● | या कमिटीने २९ शिफारशी केल्या आहेत त्यापैकी किंती पूर्ण झाल्या आहेत? | १३ पूर्ण झालेल्या आहेत. |
| १९ | सोलापूर विद्यापीठाने UGC NET परिक्षेचे केंद्र सुरु करण्याबाबत कोणते प्रयत्न केले आहेत? | याबाबत शासनास पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. |
| | | |
| २० | महाविदयालय स्तरावरील प्राध्यापक पदे (CAS व Direct Recruitment) भरण्याविषयी विदयापीठाने कोणते प्रयत्न केले आहेत? | सद्यस्थितीत गुणवत्तेवर आधारीत सहयोगी प्राध्यापक या संवर्गातून प्राध्यापक या संवर्गात पदोन्नती देण्याकरिता API चे मुल्यांकन विद्यापीठ स्तरावर करण्याची कार्यवाही सुरु आहे. तद्वतच सरळसेवा (Direct Recruitment) साठी निश्चित केलेल्या पदांचे संबंधित महाविद्यालयाकडून जाहिरात मंजूरीचे प्रस्ताव प्राप्त होताच सदरची पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल. |
| ● | Direct Recruitment साठी किती महाविद्यालयांनी जाहिरात मंजूर करुन घेतल्या आहेत? | एकही नाही |
| ● | त्याच्यासाठी रोस्टर तपासून घेणे गरजेचे आहे काय? | होय, शासनाच्या नियमाप्रमाणे सर्व कार्यवाही केली पाहिजे. |
| | | |
| | **डॉ. भिलेगावकर एस. डी.** | **श्री. गायकवाड बी. आर.** |
| २१ | शिक्षणशास्त्र विदयाशाखेच्या (बी. एड्. बी. पी. एड्.) विदयार्थ्यांना बायोमॅट्रिक उपस्थिती कोणत्या नियमानुसार सक्तीचे आहे? | दि.२६/०४/२०११ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.२२२ अन्वये सर्व संलग्नित शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांची बायोमेट्रिक उपस्थिती सादर करणेबाबत सक्तीचे करण्यात आले होते. |
| ● | ठराविक विना अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या परीक्षणावरुन अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना सक्तीचे का आहे? | अशासाठी विद्यार्थी नाहीत, तिकडे नोकरी करतात व हजेरी दाखवतात याबाबत विद्यापीठास तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. महाविद्यालयातील कर्मचारी कामास असून त्यांचे बायोमॅट्रिक आहेत व महाविद्यलयातही बायोमॅट्रिक आहेत. याबाबत सक्तीचे केले आहे. |
| ● | कोणत्या अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्यांनी आपल्याकडे अशी माहिती दिली आहे? | कुठली नाही, प्राप्त झालेल्या तक्रारीवरुन हे सक्तीचे केले आहे. |

सचिव अधिसभा
(कुलसचिव)